# प्रभुतरुण


| वर्ष ५२ | अंक ७ | मुंबई | फेब्रुवारी, २०१९ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**


*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


*संपादकीय*

## घटिका गेली, पळे गेली!

—सुहासिनी कीर्तिकर

सध्या गिरगावात रस्तोरस्ती एकच धूमधाम दिसतेय. 'मेट्रो'चा प्रकल्प आकाराला येत असल्याने पत्र्यांनी आखलेले, वेढलेले पादचारी मार्ग. त्यावर कायदेशीरच आखणी असल्यासारखे बसलेले विक्रेते - अनेक! फराळ विकणारे, भाजीवाले, फळवाले, कडधान्यवाले, पेपरवाले - दूधवाले - फुलवाले असे अनेक. त्यातच जागा अडवून लोकांना पुण्य(!) मिळवून देऊ पहाणारी गायवाली मंडळीसुद्धा. अशातून गर्दीच्या वेळी वाट काढायची म्हणजे अक्षरश: वाटच लागते. आजुबाजूला असणाऱ्या इमारतीही 'प्रकल्पग्रस्त' होऊन 'धूळ' वड खेळत अक्षरश: 'जीवंत मरण' पहाताहेत. मोडून पडताहेत. आधी मोठमोठी झाडे गेली; आता त्या झाडांच्या सावली सोबतीनं उभी राहिलेली घरे जमीनदोस्त होताहेत. होणारच ना? आपली नवनवीन प्रगतीशी, सोयीसुविधांशी दोस्ती आहे. त्यामुळं हे अगदी अपरिहार्यच. आपण प्रगतशील आहोत, वेगवान आहोत, सुधारक आहोत. तेव्हा त्याशी सुसंगत असा शहराचा चेहरामोहरा बदलत, 'सदैव मानवा पुढेच जायचे' म्हणत तोडमोडीतून घडमोड होणं अटळच. 'नव्या मनुतील नव्या दमाचा' माणूस इतका वेगवान आहे, इतकं धावपळीचं जीवनमान जगतोय की त्याच्यासाठी असे नवनवीन प्रकल्प आवश्यकच.

'वेगवान, धावपळ करणारा, जराही उसंत नसलेला असा आजचा माणूस'... असं सगळं खरं वास्तव असताना 'जे जे पसंत; त्यासाठी उसंत' असंही माणसाचं रूप दिसतं. फक्त 'जे पसंत' ते उचितही आहे का? हा प्रश्न आहे माझ्या मनात. आता पहा ना: या 'मेट्रो'साठी रस्ते आतवर, खोलवर खणले जाताहेत. तर एक पाऊलही टाकणं कठीण व्हावं; अशा गर्दीत पाचसहाजणांचा एक घोळका अगदी निवातंपणे थांबून ते 'यंत्रांचं कौतुक' पहात ऐन मोक्याच्या जागी उभा! इतरांना उपद्रव होतोय; याचं भान न ठेवता. कामकरी माणसं त्या रस्त्यांना लावलेले पत्रे अगदी रोजच्यारोज धुवून, पुसून स्वच्छ ठेवतात. पण त्यांच्या कामाला कोण पुसतो? ही निवांत माणसं येता जाता त्या पत्र्यांवर पानांच्या पिचकाऱ्यांचं नक्षीकाम करतात. खूप वेळ आहे हो त्यांच्याकडे या सगळ्यांसाठी; थांबण्यासाठी! या परिसरातील पहिली इमारत पाडली जात होती; त्यावेळची गोष्ट. अंगभर हिरवी वस्त्रं पांघरून बापडी इमारत रिकामी रिकामी उभी होती. प्रथम तिची कौलं उतरवली. मग अगदी डोक्यापासून पायापर्यंत हलके हलके हळुवारपणे तिला निर्भित केलं गेलं.. तर इथे रोजच्या रोज भोवती 'बघ्या' माणसांचा घोळका उभा. पहिल्यांदा मी हे चित्र पाहिलं; तर मला खरंच असं वाटलं की हे पाडकाम करताना एखाद्या कामगाराला अपघात-बिपघात झालाय की काय? का माणसं गोळा होऊन त्या इमारतीकडे माना उंचावून पहाताहेत? बरं, ती माणसं काही त्या इमारतीतील रहिवासी नव्हती; की त्यांना आपल्या वसतीस्थानाला निरोप द्यावासा वाटला. मी देखील क्षणभर थांबले. एकाला विचारलंही... 'का हो; अपघात झालाय का?' तर तो माझ्याकडे न पहाता म्हणाला, 'बिल्डिंग पाडतायत. अपघात कशाला होईल?' म्हणजे ती कामगार माणसं वेळ न दवडता आपलं काम घड्याळाबरहुकूम करताहेत. त्यांना वेळ नाही अन् पायाला चाकं लावून जणू धावत सुटलेल्या माणसांना हे पहाण्यासाठी मात्र वेळच वेळ! बरं; ही काही रिकामटेकडी माणसं नव्हेत. पण धावपळीच्या दिनक्रमातूनही त्यांना अशा गोष्टींसाठी वेळ द्यावासा वाटतो. काय मिळतं त्यांना यातून? कुठं वेळ द्यावा; कसं अन् कुठं वेळेचं गणित सोडवावं याची भ्रांत असलेला माणूस वेळेचं महत्त्व जणू जाणतच नाही. किंबहुना आपलं काम वेळेवारी, वेळेशी बांधणं हे सुसंस्कृत, प्रगत, विचारी जगण्यासाठी आवश्यकच आहे; याचं भानच त्याला उरलेलं नाही.

भान सुटलं की अनेक गोष्टी होतात. वेळ वाया जातो. आपण कसे आहोत हे वागण्यातून अधोरेखित होत असतं. वेळेचं भान न ठेवलं तर या व्यक्तिमत्वात उणेपणा येतो. इतरांना त्याचा त्रास होतो. आखलेल्या कार्यक्रमात - उपक्रमात - योजनांत गलथानपणा येतो अन् मग त्याचं गांभीर्यही उणावतं. आत्ता या क्षणी एक अशीच आठवण माझ्या मनाच्या तळातून वर येते आहे. कॉलेजमधल्या मराठी वाङ्मय मंडळाचा एक कार्यक्रम होता. प्रमुख पाहुणे होते... अभिनेते श्रीकांत मोघे. त्यांचा विषय होता 'माझ्या भूमिका'. पण हे नटवर्य वेगळ्याच भूमिकेत शिरले. दिलेल्या वेळेपेक्षा चांगले एक तास उशीरा आले. अगदी डुलत, डुलत. त्यांना असं वाटत होतं जणू की 'हे विद्यार्थी केवळ मला पहायला थांबले आहेत.' त्यामुळं मंचावरही ते खुर्चीत बसलेच नाहीत. समोर टेबलाशी एक पाय वर घेऊन रुबाबात त्यांनी 'पोझ' दिली. मुलांनी टाळ्या वाजवल्या. मग काय? एकापाठून एक अशा सात आठ वेळा त्यांनी 'पोझ' दिल्या. मग मात्र मुलं हसायला लागली. टाळ्या थांबल्या. मी मोघ्यांना म्हटलं, 'आधीच उशीर झालाय. आपण कार्यक्रम सुरू करूया.' तर म्हणाले 'अहो बाई; ही मुलं मला बघायला आलीत. तुम्ही का जळता?'... हे असं औधत्य मुलांना चाललं नाही. एक मुलगा उठला. म्हणाला, ''बाईंविषयी ही भाषा? चालणार नाही. 'माझ्या भूमिका' या विषयावर तुमचं बोलणं ऐकायला आलोय आम्ही. तुमच्या फालतू हातवाऱ्यांना आम्ही हसतोय; हे तुम्हाला कळलं नाही?'' पाठोपाठ दुसरा मुलगा उठला. म्हणाला, ''आम्ही सगळे तास झाल्यावर तासभर तुमच्यासाठी खोळंबून राहिलो. आता तरी सुरू करा.'' झाऽऽलं. श्रीकांत मोघे चिडलेच. मुलांच्या, कॉलेजच्या संस्कृतीबद्दल उपहासानं बोलू लागले. मला राहवलं नाही. मीही चिडले. म्हणाले, 'या मुलांना चांगलं वाईट कळतं. तुम्हीच स्वत:चं हसं करून घेतलंत. वेळेचं भान नाही तुम्हाला. आमच्या मुलांना वेळेचं भान आहे, किंमत आहे अन् ही मुलं कलेची कदर करणारी आहेत. तर मी असं जाहीर करते की वेळे अभावी हा कार्यक्रम इथे संपला.' मग मात्र ते ठिकाणावर आले. त्यांनी माफी मागितली अन् कार्यक्रम सुरळीत सुरू झाला. विशेष सांगायचं म्हणजे आमचे प्राचार्य डॉ. भ. ग. बापट यांनी दुसऱ्या दिवशी वर्गावर्गात जाऊन माझं आणि मुलांचं कौतुक केलं. त्यांना ते म्हणाले, ''तुम्हाला वेळेचं महत्त्व कळलंय. औचित्याचं भान आहे. पुढील आयुष्यात तुमची प्रगती अन् यश नक्की आहे. असंच वेळेचं भान राखा. आवश्यक तिथं दुसऱ्याला 'वेळ वाया जातोय' याची हिमतीनं जाणीव द्या.'' वेळेवर निर्णय घेणं किती महत्त्वाचं; याचा माझ्यासाठी तो धडाच झाला आयुष्यभर.

'घटका गेली, पळे गेली, तास वाजे ठणाणा' याचं भान माणसानं ठेवलंच पाहिजे ना? त्याचं भान ठेवतच मी आत्ता इथे 'वेळेवारी' थांबते. (हो! तुमचा महत्त्वाचा वेळ वाया नको जायला.)

अद्‌भूत गोष्टी-

### अनुभव

## ‘ब्रोकन विंडो’, एक मोडलेली खिडकी!

-विनय त्रिलोकेकर

(मागील अंकावरून)

विल्सन आणि केल्लिंग ह्या दोघांच्यापूर्वी स्टेनफोर्डमधील एका मानसशास्त्रज्ञ फिलिप झिम्बार्डोने ‘मोडक्या खिडकी’ची कल्पना १९६९मध्ये एका प्रयोगाच्या माध्यमातून पडताळून पाहिली होती. झिम्बार्डोने एका लायसन्स प्लेट नसलेल्या मोटरगाडीचे नियोजन केले. गाडीचे हूड उघडे ठेऊन ब्रोन्क्षच्या (Bronx) परिसरात उभी केली आणि तशीच दुसरी गाडी तशाच कार्यहीन अवस्थेत कॅलिफोर्नियातील पालो अल्टोमध्ये उभी केली.

दोन आठवडे झाले तरी कॅलिफोर्नियातील गाडीला कोणाचा हातही लागला नाही. पण ब्रोन्क्षमधल्या गाडीच्याबाबतीत त्यांना वेगळाच अनुभव आला. मिनिटाभरातच त्या गाडीवर अतिक्रमण झाले. पहिले ('vandals') आले ते होते एक कुटुंब- आई, वडील आणि त्यांचा लहान मुलगा- त्या मुलाने रेडिएटर आणि बॅटरी लंपास केली. चोवीस तासांच्या आत गाडीतील सर्व मौल्यवान वस्तू गायब! नंतर गाडीच्या खिडक्यांच्या काचा व विंड शिल्ड पूर्ण चक्काचूर! गाडीतील नरम मुलायम गाद्या (upholstery) फाडून टाकल्या होत्या. दारांचे भाग पळवण्यात आले होते. द्वाड उनाड मुले गाडीच्या टपावर खेळत होती. टपावरून खाली उडी जमिनीवर आणि जमिनीवरून परत टपावर- तळ्यात-मळ्यात, गाडीत लपाछुपी, चोर-शिपाई, आणखी काही खेळ खेळत असतील.

कॅलिफोर्नियातील गाडीला अजून कोणीही साधे शिवलेदेखील नव्हते. मग झिमबार्डो जाणूनबुजून एक हातोडा घेऊन त्या गाडीजवळ गेला आणि गाडीची तोडफोड करू लागला. त्याचे हे वागणे इतरांना 'catalist' ठरले. मग जमलेले लोक त्याला साथ देऊ लागले, तेपण त्याला गाडीची नासधूस करण्यास मदत करू लागले.

झिमबार्डोच्या ध्यानात आले की दोन्ही गाड्यांच्या बाबतीत सुरवातीला आले ते सारे 'vandals' चांगले पेहराव केलेले सभ्य घरंदाज वाटत होते. आणि लोकांची प्रवृत्ती सारखीच, फरक होता तो हा की ब्रोन्क्षमध्ये आपली मालमत्ता अशी वाऱ्यावर सोडून जाण्याचे प्रकार वारंवार घडत, ज्यामुळे ’कोणालाही काय फरक पडत नाही’ ह्या जाणीवेचे स्पंदन (’नो वन केअर्स’ vibe) आणि म्हणून विध्वंसक वृत्ती व गुंडगिरीचे प्रकार देखील तितक्याच जलद गतीने घडत असावेत. आणि कॅलिफोर्निया-सारख्या सुसंस्कृत वस्तीत जेव्हा अशा काही घटना घडतात तेव्हा म्युचुअल रिगार्ड/ एकमेकांचे सोयरसुतक आणि दिवाणी बंधने कमी होतात आणि ‘नो वन केअर्स ऑर बॉदर्स’ `No one bothers or cares’ ही भावना जागृत होते. आपल्याला नसती पंचाईत कशाकरिता? कोण सांगते उठाठेव करायला? कोणाला ही गोष्ट खटकत नाही. मग करू द्या ना इतरांना हवे तसे!

’ब्रोकन विंडो’ मूळ कल्पना फ्रेडेरिक बस्टीअट ह्यांच्या *‘जे बघितले आहे आणि जे बघितले नाही’* ह्या निबंधातून घेतलेली आहे. हा निबंध एका नैतिक गोष्टीच्या (as a parable, which is also known as the broken window fallacy or glazier's fallacy) रूपाने १८५० साली सादर केला होता. डग्लेझीअरने (काचवाला) चुकीचे तर्क करून काढलेला निष्कर्ष;

सुस्वभावी दुकानदार, जेम्सच्या क्रोधाचे साक्षीदार तुम्ही कधी झाला नसाल. त्याच्या निष्काळजी मुलाने दुकानाच्या दाराची काच फोडली होती. त्याच्या आरडाओरडीमुळे बरीच मंडळी जमली होती, आणि जमलेले बघे लोक, चांगले ३० असावेत, त्याचे सांत्वन करीत होते, ‘हा वाईट प्रवाहाचा परिणाम आहे, ज्यापासून कोणाचाच फ़ायदा नाही! सर्वांनाच जगायचे आहे. मग जर काचाच कधीच फुटल्या नाहीत तर बिचारा काचवाला जगणार कसा?’

अशा रीतीचे सांत्वन हे ह्या ‘ब्रोकन विंडो फॅलेसि’चे आधारस्तंभ आणि अशाच चुकीच्या तर्कांवरून काढलेल्या निष्कर्षावर अवलंबून असतात आर्थिक संस्था.

आपण गृहीत धरुया. नवीन काच लावून दार दुरुस्त करण्यास लागतील रु ८०. मला त्याचा विरोध नाही. तुम्ही चांगले कारण सांगितले - काचवाल्याचा फायदा! काचवाला येतो, काच लावून दार ठीक करतो, ८० रुपये घेतो. त्या निष्काळजी मुलास मनापासून आशीर्वाद देऊन निघून जातो. हे तुम्ही सारे पाहिले. हे सारे झाले *‘जे बघितले आहे’*. आणि तुम्ही निष्कर्ष काढाल की काच फोडणे ही झाली चांगली गोष्ट - काचवाल्याचा फायदा आणि

(पान ६ कॉलम २ वर)

# Marriage –

## A Necessity, requirement or just a formality

-Adhar Kothare

In today’s article we will talk about something that we all know about, some have done it, some want to, some run away from it, some feel its important, some feel its necessary, some have an opinion that it is not required, some feel its just a formality. Marriage, a concept where two people decide to be together and spend the rest of their lives with each other, but also get legally registered, and I must say this now, because, now-a-days there is also a concept of living-in together that’s getting popular. So its pretty important to distinguish the two. In India, even this marriage is divided in two types; love marriage and arranged marriage, a concept probably found only in India or Indian traditions. I got to know this that people in the west are amazed and curious at the same time when they hear about arranged marriage concept.

In earlier days probably arranged marriages were the only way people got married. I recollect my grandmother telling me, that at their times, many marriages used to happen within family and close relatives. Sometimes the bride and groom spoke with each other only after getting married, and in some weird cases even see each other post marriage. Things evolved with years and freedom was given to the boy and girl to at least meet and talk once with each other, mostly in the presence of 10 other elderly people of the house. Where most of the times guy’s family used to visit girl’s house, where girl’s family is already waiting for them with all the tam-jham. The girl will bring the tea and snacks for all the guests, with 20 eyes on her. With the girl and guy sitting awkwardly, they would be asked by their elders to ask each other whatever questions they had in their mind. It was strange that the elders thought that the moment they said that, the girl and the guy will start talking with each other as long lost friends. Then in some cases, the guy would ask a couple of questions and done, or in some cases, the elders would then ask the girl to take the guy inside and talk with each other in the context of showing him the house. It wasn’t a secret that the guy hadn’t come to buy their house, but it would act as a cue to both that they are being given time to speak with each other for few minutes. Not just that, in most cases, they were to decide to marry each other on the basis of those few spent minutes.

With time things changed and either the people of that generation felt the need or with evolving world, there was an introduction of a concept called love marriage. Where girl and guy met, knew each other through office, college or common friends. They interacted with each other, had feelings for each other, fell in love with each other. Then the process of introducing your partner at your house would follow. Some would take help of their friends, cousins and try to chalk out a plan to get a yes from their parents. Some would just drop a bomb at the parents and tell them. Few used to get lucky and their parents accepted it immediately, while most had to take immense pain to convince their parents. While few took the painful route of running away and getting married as their parents were not convinced. All in all, things evolved over time.

But today I thought I should not write about those who fell in love with each other and how they fought their way to get married and live happily ever after. Not those, where parents decided whom their sons and daughters should get married to. But I thought I should write about those, whose parents have given them the freedom to choose their life partners. Those who had or not had any past relationships, which worked or not worked. Whatever have been their past, they are those who have decided to enter the world of arranged marriage, to find their soul mate. Though we and our thoughts have evolved over time, yet the percentage of love marriage in our society is still low and the count of arranged marriages is still pretty high.

With evolving trends and technology there is a new concept that took shape, matrimonial websites, where young boys and girls registered their profiles, put their best looking pictures, mention details about them and their expectations and then the website does some internal calculations basis the expectations and return with recommended profiles. The respective boys and girls go through the recommended matches and select each other, contact, then meet, talk/chat with each other in the hope of finding their soul mate.

Actually earlier when it came to arranged marriages, the scope of matches revolved around friends’/relatives acquaintances, where some friend/relative would suggest a match and things moved from there. But with the help of these matrimonial websites, it has given the youngsters the opportunity to find their match, their soul mate outside that circle, anywhere in the world.

In this process of finding ones’ soul mate, the person searching goes through lots of ups and downs. However new and exciting it may sound initially, most of times it ends up as a tedious process.

(Cont. on Page 5 col. 3)

भवताल

# पिढीतील अंतर

-प्रणिता प्रभाकर

आज २१व्या शतकात आपण राहातो. आजचे जीवनमान खूप गतिशील आहे. परिणामी माणसांचे एकमेकास भेटणे खूपच दुरापास्त झालेले आहे. बाकी नातेवाईक, मित्र मंडळी सोडा; परंतु ज्या व्यक्तीशी आयुष्याची गाठ बांधली आहे, त्या दोन व्यक्तीसुद्धा एकमेकांना कधी भेटत असतील ते देव जाणे व त्या दोन व्यक्ती जाणे (अर्थातच नवरा- बायको). नवरा बायको जर एकमेकांना भेटणे कठीण झाले आहे तर मग त्यांची मने कशी जुळून येणार? शरीराने जवळ येऊन काय उपयोग? मनाने एकरूप व्हायला तर हवे. त्याशिवाय संसार कसा होणार?

आमच्या पिढीपर्यंत लग्न म्हणजे फक्त दोन व्यक्तींचे मिलन नसून दोन कुटुंबाचे एकत्र येणे होय, अशी संकल्पना होती. सर्वांची मने राखून संसार करणे म्हणजे थोडी कसरतच असायची. परंतु तेव्हा विभक्त कुटुंबपद्धतीला नुकतीच सुरुवात झाली होती. म्हणून चौकोनी कुटुंबपद्धती सरसावत गेली. तरीही एखाद्या मुलीला एकत्र कुटुंबपद्धतीचे सासर मिळाले तर ती सहसा नाही म्हणत नसे. ती स्वत:ला सामावून घेण्याचा वा सामावून जाण्याचा प्रयत्न करी.

विभक्त कुटुंबपद्धतीत राजाराणीचा संसार असल्याने एकमेकांसोबत खूप वेळ घालविता येत असे. त्यामुळे एकमेकांच्या आवडी-निवडी, स्वभाव समजून घेण्यास बराच अवधी मिळत असे. त्यात सासू-सासरे सोबत राहात असतील तर मुलीला संपूर्ण घराची जबाबदारी पेलण्यास सासूबाई-मामंजींची मदत होत असे. त्यामुळे नोकरी-घर-संसार व्यवस्थितपणे तिला सांभाळता येत असे. त्यातच तिला नवऱ्याची साथ मिळाल्याने भार आणखीनच हलका होई. बायको नोकरी करते म्हटल्यावर नवऱ्याचा थोडाफार हातभार संसाराचा रथ हाकण्यास लागत असे व तो ती जबाबदारी आनंदाने पार पाडीत असे. एक किंवा दोन अपत्य असल्याने काही घरातून जबाबदाऱ्या वाटून घेतल्या जात. उदा: मुले शाळेतून घरी आल्यावर आजी-आजोबा त्यांच्या चहा-नाश्त्याकडे पाहात. आई-बाबा घरी आल्यावर आई स्वयंपाकघराचा ताबा घेई व बाबा मुलांच्या अभ्यासाचा. त्यामुळे कोणा एकावर जबाबदारी पडत नसे. राहात राहिला प्रश्न तो घरातील/कुटुंबातील रीतीभातींचा! तो तर सुलभतेने सोडविला जाई. कारण लग्न करून सासरी आल्यानंतर सासरच्या चालीरीती आपण आत्मसात करून जे काही चालू आहे ते सर्व निमूटपणे करावयाचे हा शिरस्ता. त्यामुळे नकारघंटा कधी वाजायची नाही आणि वाजलीच तर फार क्वचित. हे चित्र होते ३५-४० वर्षांपूर्वीच्या संसाराचे, म्हणजे ७०-८० च्या दशकात ज्यांचे विवाह झाले त्यांच्या संसाराचे .

परंतु आता विवाह व संसार याचे चित्र पार पालटून गेले आहे. कदाचित राहणीमानात फरक झाल्याने विचारसरणीत फरक होत गेला . मुख्यत: शिक्षणमूल्यात फरक पडल्याने रहाटगाडग्यासारखा विचारसरणी व राहणीमानात फरक पडला. आजच्या पिढीवरील संस्कार चुकीचे नाहीत तर शिक्षणमूल्यात फरक पडल्याने त्यांची विचारसरणी बदलली. आजची पिढी देव मानीत नाही असे नाही; परंतु देवाचे देव्हारे न माजवता त्यांच्या मनाला पटतील त्याप्रमाणे ते करण्यास तयार आहेत. आपण त्यांना अमुक-तमुक कर असे सांगितले तर मुकाट्याने न करता त्या अमुक-तमुक गोष्टीची कारणमीमांसा करतील व पटले तरच पुढे जातील, अन्यथा नाही. आजच्या पिढीचा जोर हा कर्मावर आहे, नशीबावर नाही. त्यामुळे त्यांची सद्सद्विवेकबुद्धी त्यांना नेहमी प्रेरित करीत असते.

आमच्या पिढीने दोन्ही बाजू सांभाळून घेतल्या. अर्थातच नोकरी व घर. नवरा-बायकोंमध्ये घराची जबाबदारी जास्त करून बायकोची असे. त्यामुळे तिने घरातील पूजा-अर्चा, सण-वार सर्व काही पेलले व पार पाडलेही. नोकरी करून हे सर्व करणे तिला शक्य झाले ह्याचे कारण उघडच आहे. 'तिच्या नवऱ्याची साथ' होय. तेव्हा नोकरीची ठराविक वेळ असायची; परंतु आता तसे नाही. नोकरीला घरातून निघण्याची वेळ माहीत असते परंतु घरी परतण्याची नाही. त्यामुळे घरातील किंवा कौटुंबिक उत्सवासाठी त्यांना वेळ देता येत नाही. ही गोष्ट खरोखरच मान्य करावी लागेल (सण -वार, पूजा-अर्चा वगैरे). इतकेच नव्हे; तर त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. अर्थातच स्वत्वाकडे माप झुकलेले दिसते. आज मुलींचे लग्नाचे वय ३० च्या उंबरठ्यावर येऊन पोहचले आहे. त्याचे कारण हेच की त्यांना शिक्षण पूर्ण करून नोकरीधंद्यात म्हणजेच करिअरमध्ये स्थिरस्थावर झाल्याशिवाय लग्नाचा विचार करायचा नसतो. ही बाब मुलांनाही लागू आहे. जर समजा एखाद्या मुलाने किंवा मुलीने आपल्या जीवनाचा जोडीदार स्वत:ने निवडला असेल तर कदाचित लग्नाचा बार लवकर उडण्याची शक्यता असते. परंतु ठरवून किंवा पाहून लग्न करावयाचे असल्यास त्यात बराच अवधी जाऊ द्यावा लागतो. कारण आई-वडिलांनी शोधून दिलेली व्यक्ती आपल्याला समजून घेईल का? इथपासून ते आपल्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर त्याचा काय परिणाम होईल? अशा नानाविध शंका-कुशंकांची पाल मनामध्ये वळवळते आणि संभ्रमावस्था निर्माण होते.

तेव्हा लग्न झाल्यावर एक ते दीड वर्षात घरात पाळणा हले; परंतु आता कमीतकमी तीन ते चार वर्षे जावी लागतात. एक तर एकमेकांना समजून घेण्यात वेळ जातो. शिवाय करिअरमधील आधीच आखून ठेवलेले टप्पे गाठून मगच पुढची पायरी चढायची ह्या मतावर ठाम असतात. काहीजणांना मूल म्हणजे आयुष्यातील अडथळा वाटतो; तर काहीजणाना बंधन वाटते. काही मुलींना गरोदरपणात व बाळंतपणात जे शारीरिक बदल होतात ते रुचत नसतात. त्यांना त्यांची चण सांभाळायची असते. ह्या सर्व फंदात पडण्यापेक्षा लग्न न करता Live in Relationship ही संकल्पना अनेक जणांना/जणींना भावते व त्यानुसार त्याचे अवलंबन होते. कितीही झाले तरी शेवटी पुरुष म्हणा किंवा स्त्री म्हणा, त्यांना बाबा किंवा आई होण्याची भूक गप्प बसू देत नाही व म्हणून काही जण लग्न न करता मूल दत्तक घेण्याचा मार्ग निवडतात.

कारण एकच की, ह्यात स्वत:ची भूमिका जपली जाते व लग्न करून पुढील गुंतागुंत सोडवण्यापेक्षा हे बरे अशी समजूत असते . अर्थातच तू तू -मी मी आणि शेवटी फलश्रुती फारकतच होय!!!

पान उलटताना

# खुर्ची

-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर

वेताची एक रंगीबेरंगी खुर्ची पलंगाखाली ठेवलेली आहे. छोटीशी. माझ्या पहिल्या वाढदिवसाला आजीने माझ्यासाठी घेतली होती. ही खुर्ची माझी एकट्याची. कारण मोठं कोणी त्यात बसूच शकत नाही. कधी-कधी गंमत म्हणून मोठे तिच्यात बसायचे आणि मग उठले, की खुर्चीही उठायची त्यांच्या बरोबर. मग दुसऱ्या कोणीतरी पाठीमागे जायचं आणि खुर्ची घट्ट पकडायची आणि अडकलेल्याला म्हणायचं, 'हो पुढे', तेव्हा कुठे अडकलेल्या जीवाची सुटका. मी मोठा होत गेलो, तशी खुर्ची लहान होत गेली. म्हणजे खरं पाहिलं तर खुर्ची होती तेवढीच राहिली. पण मी तिच्यात मावेनासा झालो इतकंच.

मग आजी म्हणाली, ''ती खुर्ची आपण बंटीला देऊया' बंटी हा आत्याचा मुलगा माझ्यापेक्षा खूप लहान. म्हणजे त्यांच्यासाठी एकदम बरोबर ती खुर्ची. पण मला ती देववेना. आता सरळ नाही तरी कसं म्हणायचं? म्हणून मी म्हटलं, ''आजी, बंटीसाठी जुनी खुर्ची कशाला? त्याच्यासाठी आपण नवी घेऊया ना?'' नशीब की आजीला पटलं.

आत्याच्या बंटीसाठी आजीने आणलेली खुर्ची जास्त छान होती. एकदा वाटलं अदलाबदल करावी का? पण आधी म्हणून झालं होतं ना, की बंटीला जुनी कशाला म्हणून. शिवाय नंतर विचार केल्यावर वाटलं, की बंटीची खुर्ची जास्त छान का वाटतेय, तर रंग वेगळे आहेत म्हणून शिवाय नवी असल्यामुळे जास्त चमकतेय. पण आपली जुनी झाली, तरी आपली ती आपलीच. त्या खुर्चीवर बसून आपण टी.व्ही. पाहिलाय. ती खुर्ची आपण उलटी पाडून गाडी-गाडी करत घरभर फिरवलीय. तिच्या कडांचा वेत घासला पण गेलाय थोडासा. तिच्यावर बसवून आजीने, आईने आपल्याला मंमं भरवलाय.

मग आपले पाय लांब करून बसायला लागावे इतके लांब झालो, म्हणून आपण थांबलो त्या खुर्चीवर बसायचे. तरीही मधूनच येते लहर. मग काढतो तिला पलंगाखालून. तिच्यावर ठेवलेल्या फुटबॉलला देतो ढकलून पलंगाखाली, आणि घेतो हौस पुरवून त्या इवल्याशा खुर्चीत बसायची. पण बंटी कधी आला की मात्र खुर्ची पलंगाखालीच ठेवायची. अगदी आत ढकलून. बंटीला दिसणार नाही अशी. चुकून आवडली-बिवडली त्याला, तर पंचाईत. आजी म्हणेल, ''देऊन टाक ना त्याला. तू नाहीतरी हल्ली बसतोस कुठे त्या खुर्चीवर?''

घरात आणखीही एक खुर्ची आहे, जिचं नाव आहे 'आबांची खुर्ची. आबांनी ज्या ऑफीसमध्ये पस्तीस वर्षे काम केलं, त्या ऑफिसात ते ज्या खुर्चीत बसायचे, ती लाकडी खुर्ची ऑफीसने त्यांना भेट दिली. आबा त्याच खुर्चीत बसून टी.व्ही. बघतात. चहा घेतात. ही आबांची खुर्ची इतकी मोठी आहे, की आबांच्या बाजूला बंटीसुद्धा त्या खुर्चीत बसू शकतो. ही खुर्ची लहान होण्याचीही शक्यता नाही. घरातले कोणीही हवं तेव्हा जाऊन बसतात त्या खुर्चीत. आबांना ते आवडत नसणार कदाचित. पण मोठे पडले ना ते? मग सांगणार कसं? घेतात चालवून जसं होतं तसं.

आमच्या दोघांच्या खुर्च्या सोडून बाकी कोणाचीही खास खुर्ची नाही घरात. बसतात आपले कुठल्याही खुर्चीत कधीही. मला आपलं वाटतं, की प्रत्येकाची स्वत:ची अशी एकेक खुर्ची असायलाच हवी हक्काची. त्याला हवं वाटेल तेव्हा हक्काने बसता येईल अशी. आणि ज्या खुर्चीतून त्यांना कोणीही उठवू शकणार नाही अशी.

(मो. ९९६९०१८९६७/ ८७७९१९४०४२)

आरोग्यम्

# बाळा, माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे

-डॉ. छाया अजित देसाई

बाळा, माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे. अमेय हा एक फार हुशार मुलगा होता. तो १० वी ला आणि १२ वीला गुणवत्ता यादीत आल्यामुळे त्याला इंजिनियरींगच्या उत्तम कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. पालक व इतर नातेवाईकांना त्याच्याबद्दल खूप अभिमान वाटला. घरचं वातावरण पूर्णतः आनंदी व उत्सवाचे होते. पालकांना समाधान वाटत होते की आपल्या अमेयने आपली स्वप्ने पुरी केली.

तीन महिने झाले आणि मग एक दिवस वडिलांना अमेयच्या शिकवणीच्या मॅडमचा फोन आला. वडिलांचा आपल्या कानावर विश्वासच बसेना. शिक्षिका अमेयबद्दल तक्रार करीत होत्या की अमेयचे क्लासमध्ये लक्ष नसते. त्याचा अभ्यास व त्याची एकाग्रता दोन्हीही फार खराब होत चालली आहे. त्याचे वर्तनही फार बदलले आहे. तेव्हा शिक्षिकेने एक सुचवले की अमेयला फिजीयालॉजीकल कन्स्लटंटकडे नेले तर बरे.

हे ऐकून वडील तर सैरभैरच झाले आणि शिक्षिकेलाच उलट विचारू लागले की त्या काय अमेय वेडा आहे असे सुचवू पहात आहेत का? ते इतके रागावले की ते शिक्षिकेलाच धमकी देऊ लागले की ते अमेयला दुसऱ्या कोणत्यातरी क्लासला पाठवतील.

अशाच प्रकारची प्रतिक्रिया ९० टक्के पालकांकडून येते. ते मान्य करायलाच तयार नसतात की आपला हुशार मुलगा अभ्यासात मागे पडू शकतो. त्यातून एखाद्या मनोरुग्णतज्ञाकडे जाणे म्हणजे कल्पनाशक्तीच्या पलिकडचेच. मनोरुग्णतज्ञाकडे जाणे म्हणजे आपला मुलगा मनोरुग्ण आहे किंवा त्याच्या डोक्यावर परिणाम झाला आहे हे स्वीकारणं; असं त्यांना वाटतं.

पण अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवतेच का हुशार मुलांच्या बाबतीत? ही मुलं सुरक्षित अशा कुटुंबातूनच येतात. त्यांना पालकांचा भरीव पाठिंबा असतो. शाळेत ही मुलं खूप छान प्रगती करतात. कारण शाळेतील वातावरण घरच्याप्रमाणेच सुरक्षित असतं. अभ्याससुद्धा नेमून दिलेला असतो. त्यामुळे तो कसा करायचा हा प्रश्न नसतो. आपल्याकडून काय अपेक्षा असते हे मुलांना ठाऊक असते. पण जेव्हा ही मुले व्यावसायिक महाविद्यालयात जातात तेव्हा त्यांना बाहेरच्या जगाला पहिल्यांदाच तोंड द्यावे लागते. वर्गातील मुलं तसेच शिक्षक यांचे सुरक्षाकवचसुद्धा नष्ट होते. त्यामुळे ही मुलं हरवल्यासारखी होतात. शिवाय स्पर्धा तर इतकी प्रचंड असते की मुलांना हे सर्व झेपणे कठीण जाते.

पालकांकडून आपल्या मुलांबद्दल अपेक्षा किती असतात हे ह्या मुलांना पुरेपूर माहीत असते त्यामुळे जर ते कुठे कमी पडत असतील तर त्यांना आपल्या पालकांना आपण कुठेतरी दुखावतो आहोत किंवा त्यांचा अपेक्षाभंग करत आहोत असे वाटून फार अपराधीपणाची भावना निर्माण होते. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे ही मुले आतल्या आत कुढू लागतात. त्यांची एकाग्रता भंग होते. ही मुले दुसऱ्याबरोबर मिसळत नाहीत. पालकांनी काही विचारलं तर त्याचं उत्तर एकतर कठोरपणे दिलं जातं किंवा उडवून दिलं जातं. हे सर्व त्यांच्या मनातील भीतीमुळे होते. मग ही मुले धड खात नाहीत. कशातही स्वारस्य घेत नाहीत.

हीच खरी वेळ आहे की जेव्हा पालकांनी ही सर्व लक्षणे ओळखली पाहिजेत. आणि जाणून घेतले पाहिजे आपल्या मुलांमध्ये काहीतरी समस्या आहे. ही वेळ मुलांना दोष देण्याची नसून त्यांच्याबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याची आहे आणि आपल्याबरोबर त्यांना मोकळेपणाने बोलण्यास उद्युक्त करण्याची आहे व आपल्या समस्येवर चर्चा करण्यास त्यांना उत्तेजित करण्याची आहे.

हे सर्व शक्य नाही झाले तर फिजीओलॉजिस्ट अथवा काऊंसिलरची मदत घेणे अतिशय आवश्यक आहे. काऊंसिलर मदत करू शकतात कारण त्यांना तसे प्रशिक्षण दिलेले असते. शिवाय मुलांनाही परक्या माणसासोबत आपले मन मोकळे करणे सोपे जाते. आपल्या माणसासोबत बोलताना आपण त्यांना दुखावणार तर नाही ना ही भिती असते.

अशी ही व्यावसायिक मदत जर योग्य वेळी घेतली तर मुले निराशेच्या अंधःकारात जाऊन आत्महत्येला उद्युक्त होण्यापासून वाचतील.

अलिकडच्या काळात आपण पहातो की आत्महत्येचे प्रमाण युवा जनतेत वाढत आहे. ह्याची अनेक कारणे आहेत. जीवघेणी अभ्यासातील स्पर्धा, काहीतरी मिळवण्याकरीता आयुष्यात आलेला तणाव, पालकांच्या अवास्तव अपेक्षा आणि त्यांची स्वप्ने. सध्या बहुतांश पालक आपापल्या व्यवसायात मग्न असतात. दोन्ही पालक घराबाहेर असतात. तेव्हा मुलांना आपल्या समस्यांवर जर चर्चा करायची असेल तर ते उपलब्ध नसतात. सध्याच्या छोट्या कुटुंबपद्धतीत मुलांना फार एकटेपण जाणवते अशी अनेक कारणे आपण सांगू शकू. पण मुख्य मुद्दा काय; तर पालकांनी जास्त दक्ष असणं जरूर आहे. मुलांची वागणूक किंवा त्यांच्या वर्तणुकीतील फरक लवकरात लवकर ओळखणे आणि त्यासाठी मदतीची पावले उचलणे फार महत्त्वाचे आहे.

फिजिशीअन किंवा काऊंसिलरची मदत वेळेवर घेतली कोणताही न्यूनगंड न ठेवता, तर अशा कितीतरी आत्महत्या आपण वाचवू शकू.

ही आजची अगदी निकडीची गरज आहे. पालकांनी डोळसपणे संवेदनशीलतेने आणि खुल्या मनाने आपल्या मुलांकडे पहाण्याची आणि त्यांना गरज असेल तेव्हा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहाण्याची नितांत गरज आहे.

*

# Trip to Newzeland with wonderful Cousines

**- Ullhas Khanderao Ajinkya**

Way back in 2008, Deepa vahini & Niranjan (my cousin) invited me my wife to NZ and we planned the same in December 2018. Being a senior citizen I was hesitant to travel alone with my wife, but fortunately my cousin here Dr. Paresh Navalkar & Priyanka vahini agreed to join us. My morale boosted since a doctor was accompaning us.

On 14th Dec 19, we received a grand welcome in Auckland with a glass of fruit juice made by Deepa Vahini. on 15th & 16th Dec. we took rest & settled down. We travelled from India in a group of four, joined by two more cousins with their spouses in auckland. on 15th dec. we relished a dinner at sandhya (my cousin) & shesh's residence.

Our entire trip in NZ, was planned by Mrs. Vaidehi Shreyas Rane (my niece) in such a nice way, taking into consideration my age. Hats off to Vaidehi. on 17th dec. we 4 cousins along with our spouses (group of 8) travelled to waitomo caves in 2 cars. We had a wonderful experience in polynesian spa. We stayed in rotorua for 2 nights. On 18th dec. we visited geyser & agrodome. In geyser we witnessed sulpheric volcanoes & in agroclorne we saw sheep shearing, we visited Mauri village also. On 19th dec we visited Huka falls & travelled back to auckland.

After a gap of 2 days we flew to wellington on 22nd dec & drove to kaikoura after picton ferry ride. on 23rd dec. we visited amtartic centre & whale watching site. In antartic centre we faced - 18 degree temperature with chilly winds for 5 minutes. It was a wonderful experience. on 24th, we travelled by tranz alpine train of kiwi railway, (knonw as one of the best 10 rides in the world) for 5 hours watching scenic beauty of range of alps mountains. on 25th dec we travelled to queenstown by road & spent 3 nights in queens town.

On 26th dec. which is known as boxing day in NZ, we had a helicopter ride for 45 minutes with alpine landing. our helicopter ride was possible because of Nishad (sandhya & shesh's son) who grabbed the best deal for us. Here I would like to mention that Nishad got a prize of U.S. dollar 50,000/- with his two colleagues, from U.S. Goverment for inventing & fixing a stable camera on the drone. Nishad's inverview to american T.V. Channel is available with me.

On 26th dec. we also visited wanaka & arrowtown. Our luge experience was also thrilling with chair lift & gandola ride earlier. On 27th dec. we undertook the cruise ride to visit milford sound. on 29th dec after returning to auckland, my wife's (Anju) birthday was celebrated lavishly by my cousins & their spouses. We both became emotional with the love & affection of my cousins & their spouses. On 30th & 31st dec. we again had a cruise ride to see bay of islands & our cruise passed through the hole in the rock. It was the best experience of our life. we returned to India on 3rd Jan 19. I will not forget to mention that not only were we entertained by my cousin's families but their friends, Dr. Shirish Karnik & fly. Vishal & Mita Vyavaharkar & fly & Manju Puranik & fly as well. To couclude me & my wife (anju) thank almighty for giving us such wonderful cousins & their spouses staying in India as well as abroad & if at all there is a rebirth, I pray to God to bind me with such wonderful cousins & their spouses for ever.

Indeed it was a memorable trip, which we will remember for ever.

*

Report

# Box Cricket Tournament 2018-2019

-by Jayant Kirtikar

This year the box cricket tournament was organised solely by pathare prabhu social samaj on the 20th Jan 2019 at the lions club foundations basketabll court, near milan subway, santacruz (w.).

In all, 10 teams comprising of 92 players participated in 17 matches throughout the day, which had 2 ladies/children teams for the 1st time. The youngest player was 7 year old Veer Gunjarav Nayak, and the young at heart senior most player for whom the late smt. Vandana P. Navalkar had sponsored a trophy; was 79 year old Diwakar Kothare.

At around 8.30 a.m., Jt. secretary Mr. Jayant Kirtikar welcomed everybody and requested vice president Mr. Tushar Kirtikar to inaugurate the tournament by the toss of the coin for the 1st match of the day played between team a and team b.

The Ladies / Childrens team winners was the team captained by Pranoti Kirtikar which included Shweta Talpade, Pallavi Kothare, Anusha Agaskar, Master Ashwin Talpade & Miss Avanti Talpade. Bhoopali Senjits team were the runners up which had Salomi Senjit, Vidya Talpade, Rutuja Vijaykar, Pradnya Kothare-Rege, Shwetali Vijaykar-Bhalekar, Shruti Dhurandhar-Devrukhkar, miss Ashvika Vijaykar, Master Ayyan Agaskar, Master Veer Nayak. The best Batsman trophy was won by Pranoti Kirtikar and the best bowler was Ayyan Agaskar. All the trophies of the ladies / childrens event were sponsored by Mr. Anil Rao in memory of his father late Mr. P.K. Rao of Pathare Prabhu Cricketers.

The mens tournament was won by Team F captained by Paraj Dhurandhar, which included Vijay Dhurandhar, Prathamesh Kothare, Dr. Tanmay Vijaykar, Deep Senjit, Rohan Talpade, Yash Talpade, Raj Kirtikar and Omkar Kothare. Amit Agaskars Team H were the runners up. It had Dr. Praful Vijaykar, Uddayan Gorakshakar, Jatin Kothare, Yug Kothare, Uday Talpade, Satej Rane, Diljit Gorakshakar and Mandar Kothare.

The best batsman trophy was won by Paraj Dhurandhar, the best bowler was Omkar Kothare and the best fielder was Dr. Tanmay Vijaykar. The man of the tournament trophy was also won by Paraj Dhurandhar. The trophies for the men's event were sponsored by Mrs. Vandana Rane-Jogi in memory of her maternal grandfather late Mr. Raghunandan Kirtikar.

Mr Rajesh Sutar, Ex-Mumbai Ranji Trophy player was the chief guest of the Tournament. Jt. Secretary Mr. Jayant Kirtikar while introducing him mentioned his career record, the highlight of which was a 98 run partnership with Sachin Tendulkar in a 3 day match against Australia. He told Mr. Sutar that Pathare Prabhus is a cricket loving community who in the past had the late Mr. Dinkar Sunderrao Talpade who played Ranji Trophy under the captaincy of late Vijay Merchant in late 1930's Mr Dinkar Talpade was also selected for Indias national team Mr. samir Kiran Talpade also played Ranji Trophy for Mumbai. Many Pathare Prabhus played school, college and office cricket, Kanga League and other tournaments Mr. Sutar was felicitated by a flower bouquet by Jt. Secretary Mrs. Neeta Senjit. Mr. Sutar in his short speech said that he was happy to note that a good mix of young and seniors including ladies/children participated in the tournament. He said more and more youngsters should take up cricket seriously as there were many opporunities for cricketers now. He thanked the PPSS for inviting him as chief guest for the function and promised to help in whatever way he could.

In his vote of thanks address, Jt. Secretary Mr. Jayant Kirtikar thanked the following donors / sponsors of the tournament. 1) Late. Smt. Vandana Pramod Navalkar 2) Mrs. Vandana Rane - Jogi, 3) Mr. Banisidhar Sadashiv Dhurandhar. 4) Mr. Charudatt Navin Chandra Dhairyawan who sponsored the Breakfast & Tea 5) Mr. Anil P. K. Rao 6) Mr. Santosh Aanadrao Navalkar 7) Mr. Kiran Ramchandra Talpade 8) Mrs. Neelan & Mr Deepak M. Dhairyawan 9) Mr. Ashok Vinayak Talpade

President Smt. Swati Praveen Rane sponsored the Tennis Balls for the tournament and Mr. Rashmin Praveen Rane did the artwork for the advertisement on facebook and whats app.

Mr. Jayant Kirtikar also thanked Mr. Sudhir Dhurandhar for providing the catering service for the tournament and mrs. Ameeta Mankar for assisting him. He thanked Mr Raju Talpade for using his good offices to arrange for MCA umpires and scorer, and Mr. Rahul Agaskar for Photographing the Event. Mr. Abhijit Vijaykar assisted in collection of players contribution. He also thanked committee Member Anirudh Kirtikar for preparing the score board and other sign boards. The stumps were arranged by Mr. Yadnesh Dhurandhar Board and other sign boards. The rules of the tournament were framed by Jayant Kirtikar and Vijay Dhurandhar Jt. Secretary Mrs. Neeta Senjit announced the list of winners and runners-up of womens/children and mens teams for the Chief Guest to give away the trophies.

The tournament organising committee comprised of Jt. Secretaries, Jayant Kirtikar and Neeta Senjit and Committee member Vijay Dhurandhar, Abhijit Vijaykar, Anirudh Kirtikar, Prasad Kirtikar & Pallavi Kothare.

Nearly 200 people attended the tournament, the palyers and the spectators were provided with breakfast/lunch/tea on behalf of the samaj The tournament ended by 6 p.m.

**NB** : A notable feature of the tournament was, three generations of the Kothare family from pune, Mr. Sudeep, Akshay and Arman played together for the 3rd consecutive year.

✳

---

(Cont. from Page 2 col. 4)

Some find their soul mates immediately, while most others take some time, it's a part and parcel of the process.

While guys come across girls mostly who have regular demands/expectations, such as the guy should be educated, working, earning good enough, from a well to-do family, etc., there are some demands from girls that guys come across which are weird, which makes the guy think, sometimes it dampens his own self-confidence, sometimes he thinks how can a girl demand that. And it's not just the girls, but even the guys come up with their own weird demands/expectations.

So at one end there are guys who come up with demands such as the girl should not only be educated, working, earning good enough, from a well to do family but should also be an excellent cook, should take care of her career and the house as well. From the guy's point of view, those are all demands that are pretty normal and there is nothing abnormal about it, more so because he has seen his own mother does the same, handling the job and home and family all together and not complaining even once. So for him it is pretty normal to expect all those things from his future wife, but what the guys don't realise is that, the times have changed, the girls now a days aren't like the ones of our mother's generation. They are equally educated or probably more than the guys, have higher career aspirations, have much more demanding jobs than the previous generations, they no more have those work times of 9-5, they get equally tired and are stressed from work when they come back home and hence either have no energy left or don't cherish the thought of cooking a sumptuous meal for the family. At the other end there are guys, who have some added demands such as dowry, gifts, big-fat wedding, etc.

The demands of the girls are equally weird, from asking a guy's salary to be 1cr+ while the girl herself earns 2-3 lakhs to asking a guy to have 1-2 flats. From the girl's point of view, these demands seem very normal, as she expects her future husband to be well settled and provide her with life after marriage as fancy as it was in her parents' house, more so because she has seen her own father doing the same, from earning loads of money, to buying houses, to fulfilling every demand that his daughter has ever asked him and also spending quality time with his family. But what the girls don't realise is that, things have changed a lot now, competition is much tougher at the corporate level, a guy has to balance between being more productive at work than others and giving time to his family, and more importantly, the girls have seen their dad's only after few years into jobs and marriage, the image of their father's is of the current life, after the person has spent some 25 years working and is more settled in their lives, have they ever thought or asked their mother how their father was, when they met each other, when they started their careers. It is so unrealistic to expect from the guy; of almost your own age, in a world where guys and girls get equal opportunities with respect to education, jobs, etc., and yet expect that he should earn 10 times more than the girl, have couple of flats, having a vehicle is considered almost mandatory, at least a 2 wheeler, if not 4 wheelers.

There are other more specific expectations of some girls such as the guy and the girl should stay separately post marriage and not with parents, the guys house should not have elderly persons. And most of the times, the excuse given is, that the girl is leaving her parents house and moving to the guys' house, so why can't the guy leave his parents as well. I'm not against it completely, as I understand that the girl would be entering a new home, a new world altogether, so its important for her to have her own space, where she could take her own decisions as well, which unfortunately in most of the joint-family houses don't happen. But without knowing the guy and his family, straight away demanding a separate house, is something which I think is impractical.

(Cont. in next issue)

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्रीम. हेमलता केशव कोठारे यांजकडून नातू चि. धनेश अमित राजपूरकर आणि चि. युवन अमित राजपूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त रु. २००२/-

✶ सौ. अनिला आणि डॉ. प्रा. प्रभाकर विनायक कोठारे यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ रु. १००१/- (मालाड)

✶ श्रीम. कस्तुर रवींद्र तळपदे याजकडून रु. १००१/-

✶ सौ. पद्मिनी शशिकांत राणे यांजकडून रु. ५००/-

⁕

## अभिनंदन

✶ आर्किटेक्ट डॉ. सुरेन्द्र चंदुलाल राणे यांची वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे प्राचार्यपदी नियुक्ती झाली.

✶ श्रीम. मृदुला प्रभुराम जोशी (पूर्वाश्रमीच्या आगासकर) यांनी एका पुस्तक प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे असलेल्या डॉ. रामदास भटकळ यांचा परिचय करून दिला.

✶ २०-१-१९ रोजी मुंबईत झालेल्या आंतर्राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही सौ. अनुराधा सीमित देसाई यांचा यशस्वी सहभाग होता.

✶ 'गुमनाम है कोई' हे शिल्पा नवलकरलिखित रहस्यमय नाटक सध्या रंगभूमीवर गाजत आहे.

✶ यवतमाळ येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील 'समीक्षेवरील समीक्षा' या चर्चासत्रात प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचा सहभाग होता. त्यांनी संपादित केलेल्या 'अक्षर-साहित्य'चे प्रकाशन याच संमेलनात संमेलनाध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते झाले. मुंबई मराठी साहित्य संघाचे महानगर मराठी साहित्य संमेलन या वर्षी कल्याण येथे झाले. त्याच्या आयोजनात आणि त्यावेळी सादर झालेल्या 'गदिमायन' कार्यक्रमात त्यांचा सहभाग होता. साहित्य संघाच्या 'अक्षर साहित्य' तर्फे अनेक साहित्यिक कार्यक्रम दर महिन्याला होतात. त्याचेही प्रास्ताविक, आयोजन त्यांचेच असते.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन

⁕

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

१५-१-१९ पूर्वाश्रमीच्या डॉ. पायल प्रदीप राणे
आत्ताच्या सौ. पायल आचरेकर, पुत्र, ठाकुरद्वार

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| १२-१२-१८ | श्री. आशीष शेखर कीर्तिकर | कु. अमरिशा निरूपा सांभारे (आं.ज्ञा.) |
| १३-१२-१८ | कु. दिशा चेतन कोठारे | श्री. श्रीकांत चिदंबर ढोले (आं.ज्ञा.) |
| २६-१२-१८ | कु. अदिती हेमंत जयकर | श्री. केतन बलवंत सावंत (आं.ज्ञा.) |
| २९-१२-१८ | कु. प्रियांका मुकुल वाझकर | श्री. हितेश नारायण गोडे (आं.ज्ञा.) |
| ३०-१२-१८ | कु. प्रियांका नरेन्द्र जयकर | श्री. किरण दयानंद बंगेरा (आं.ज्ञा.) |

### विवाह सुवर्णमहोत्सव

| | | |
|---|---|---|
| ०६-१२-१८ | डॉ. प्रा. प्रभाकर विनायक कोठारे, | कु. अनिला बब्रुवाहन धुरंधर |
| २२-१२-१८ | श्री. नंदकुमार यशवंत नवलकर, | कु. सुनीता केशवराव जयकर |
| ०३-२-१९ | श्री. उदय चापाजी कीर्तिकर, | कु. माधुरी इंद्रसेन नवलकर |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १८-१२-१८ | श्रीम. सुधा सुहास देसाई | वय ८९, | झावबावाडी |
| ०५-१-१९ | श्री. सुनील बाळकृष्ण धुरंधर, | वय ७८, | बोरीवली |
| २१-१-१९ | श्री. अनिल मनोहर नवलकर, | वय , | दादर |

(पान २ कॉलम २ वरून)

त्याचबरोबर काच-कारखान्याला उत्पन्न, कारखान्यातील कामगाराला मिळकत!

पण तुम्ही बघितले नाही ते हे की आपल्या दुकानदार जेम्सने रु. ८० दुसऱ्या कशासाठी अगोदरच खर्च केले होते आणि तो आता काच लावण्यासाठी परत खर्च कसा करणार? कदाचित त्याला आपले जुने बूट दुरुस्त करायचे असतील किंवा दुकानात नवीन पुस्तके आणायची असतील. हे तुम्ही बघितले नाही. आणि हे झाले 'जे *बघितले नाही*'. चुकीचे तर्क करून काढलेला निष्कर्ष *म्हणून फॅलेसि!*

'ब्रोकन विंडो' ह्याला आपण तर्कशास्त्रातील एक विधान म्हणूया. अशाच आणखी एका संकल्पनेचा उलेख करावासा वाटतो तो म्हणजे माल्कोम ग्लैडवेल ह्यांच्या 'The Tipping Point'. The Tipping Point म्हणजे कलंडण्याचा क्षण होय. प्रत्येक बाबतीत असा एक क्षण असतो. पाण्याचे १०० औ.सी.ला उकळून वाफेत रूपांतर होते. त्याला आपण उत्कलन अंक किंवा उकळ बिंदू म्हणतो, बरोबर? धरणाला असते धोक्याची पातळी आणि 'क्रिटिकल मास' हा अणुविभाजनाचा तोच जादूचा क्षण. प्रत्येक गोष्टीला असतो हा जादूचा क्षण - उकळ बिंदू, मग ती एखादी कल्पना असो, एखादी सवय असो, एक फॅशन असो, नवीन कल किंवा प्रथा असो - एक लक्ष्मणरेषा आणि त्या गोष्टीने जर का तो बिंदू गाठलाच की मग गोष्ट वणव्यासारखी पसरते. थोडक्यात टीपपिंग पॉइन्ट म्हणजे तोच जादूचा क्षण जेव्हा एक कल्पना, सामाजिक प्रथा, फॅशन किंवा सवय मर्यादेचा बांध ओलांडून वणव्याप्रमाणे फैलावते.

भावना संसर्गजन्य असतात. एखाद्या रोगाची साथ पसरते त्याचप्रमाणे त्याही सहज फैलावतात. ह्यालाच आपण 'ब्रोकन विंडो' किंवा 'टीपपिंग पॉइन्ट' परिणाम म्हणूया. ह्याच परिणामांमुळे घडत असतात बदल, काही चांगले तर काही वाईट. सुरुवात होते एका कल्पनेने, कल्पनेची होते एक लाट, लाटेचा होतो प्रवाह, प्रवाह बनतो एक लढा- चळवळ- क्रांती!

मला राजकारणाचा गंध नाही आणि माझा इतिहासही तितकासा चांगला नाही. तरीही मला वाटते खालील घटना ह्याच 'ब्रोकन विंडो' किंवा 'टीपपिंग पॉइन्ट' परिणामांमुळे घडल्या!

(क्रमशः)

## पाठारे प्रभु चारिटीज

नोंदणी क्रमांक अ १४६१/मुंबई

### वैद्यकीय चिकित्सा शिबीर

रविवार, दिनांक १०/३/२०१९
वेळ : सकाळी १०.०० ते १.३०
स्थळ : सुरेश विठ्ठल हॉल

अनेक मान्यवर धन्वंतरींची मोफत सेवा व सल्ला ज्ञातीयांसाठी उपलब्ध केला जाणार आहे. आपला रक्तगट कोणता आहे व रक्तात साखरेचे प्रमाण किती; याची तपासणी करण्यासाठी खास व्यवस्था केली आहे. कार्डियोग्राम मोफत काढला जाईल. हाडामधील कॅलशियम तपासणीसुद्धा केली जाईल.

कर्करोगाचे निदान करण्यासाठी खास तपासणी केली जाईल.

गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा.

पाठारे प्रभु चॅरिटीज
विश्वस्थ मंडळाकरिता
**उदय शं. मानकर**
अध्यक्ष - विश्वस्त

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67